# विरहिणी

हे सावळ्या मेघा
जा सख्याच्या देशा
दे निरोप हा त्या
पाहे वाट प्रिया ||१||

झाले मास किती
गेला परदेशी
खबर ना त्याची
उलघाल माझी ||२||

राती नीज नाही
दिनी चैन नाही
सखा जर नाही
दुःखा पार नाही ||३||

आर्त विनवणी
घाल त्याच्या कानी
काढी आठवणी
त्याची विरहिणी ||४||

– नारायण
०७/०४/२३